**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
१२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२
☎ (०२५६४) २३०००९
✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक ३०/१०/२०२३.

**-: प्रेसनोट :-**

**आलोसे १) श्री.जयेश शंकर तेजी, वय–४० वर्षे, व्यवसाय–सफाईगार, ग्रामीण रुग्णालय धानोरा, जि. नंदुरबार,रा. ग्रामीण रुग्णालय स्टाफ क्वार्टर्स, धानोरा, ता.जि.नंदुरबार व आलोसे २) श्री.तुकाराम भिला भोई, वय–४३, व्यवसाय–खाजगी चालक, रा. भोईगल्ली, नवनाथ टेकडीजवळ, नंदुरबार आलोसे १ श्री.तेजी यांनी वेळोवेळी १२,०००/– रुपये लाचेची मागणी केली. तसेच आलोसे २) श्री.भोई यांनी लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिले असुन आलोसे १.श्री. तेजी यांनी तडजोडीअंती १०,०००/– रुपये लाचेची मागणी रक्कम स्विकारले बाबत...**

| | |
|---|---|
| **घटक** | **नंदुरबार** |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | नंदुरबार शहर पो.स्टे.गु.र.नं ८४८/२०२३ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अ, १२ व भादंवि कलम १७० प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | आरोपी क्र. १) श्री.जयेश शंकर तेजी, वय–४० वर्षे, व्यवसाय–सफाईगार, ग्रामीण रुग्णालय धानोरा, जि. नंदुरबार,रा. ग्रामीण रुग्णालय स्टाफ क्वार्टर्स, धानोरा, ता.जि.नंदुरबार व आरोपी क्र. २) श्री.तुकाराम भिला भोई, वय–४३, व्यवसाय–खाजगी चालक, रा. भोईगल्ली, नवनाथ टेकडीजवळ, नंदुरबार |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १२,०००/– रुपये (बारा हजार रुपये) |
| **तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम** | १०,०००/– रुपये (दहा हजार रुपये) |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ येथे बस चालक असून ते चालवित असलेल्या बसला दिनांक ०५/०५/२०२३ रोजी अपघात झाला. याकरीता तक्रारदार यांनी रूग्ण निवेदन केलेले होते. त्यानंतर बरे वाटत असल्याने त्यांना कामावर पुन्हा हजर व्हावयाचे असल्याने त्यांना सिव्हील हॉस्पिटल येथील फिटनेस सर्टीफिकेटची आवश्यकता होती.<br>याकरीता तक्रारदार यांनी त्यांचा मित्र संजय वळवी यांना दि.२६/१०/२०२३ रोजी संपर्क साधला असता त्याने सांगितले की, सिव्हील हॉस्पिटल येथील त्यांचे ओळखीचे असलेले लिपीक श्री. जयेश तेजी यांचा फोन येईल व ते फिटनेस सर्टिफिकेट काढून देण्यास तुम्हाला मदत करतील.<br>त्यानंतर आरोपी लोकसेवक श्री.जयेश शंकर तेजी, सफाईगार, ग्रामीण रुग्णालय, धानोरा, जि. नंदुरबार यांनी तक्रारदार यांचेकडून सिव्हील हॉस्पीटल येथून त्यांचे ओळखीचे डॉक्टरांकडून मेडीकल फिटनेस सर्टीफिकेट काढून देण्याचे मोबदल्यात दिनांक २७/१०/२०२३ रोजी १२,०००/–रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/– रूपये लाच स्वीकारल्याचे मान्य करून मागणी केलेली लाचेची रक्कम दिनांक ३०/१०/२०२३ रोजी पंच साक्षीदार यांच्या समक्ष देसाई पेट्रोल पंप, शक्तीसागर |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| | चौक, नंदुरबार येथे स्विकारली, आरोपी लोकसेवक श्री तेजी यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी ते सिव्हील हॉस्पीटल, नंदुरबार येथे लिपीक असल्याचे सांगून १०,०००/—रूपये लाचेची मागणी करून ती पंच साक्षीदार समक्ष स्विकारली.<br>तसेच लाच मागणी पडताळणी कार्यवाही व सापळा कार्यवाही दरम्यान यातील तक्रारदार श्री वळवी यांनी आरोपी क्र. १ श्री तेजी यांना नमुद फिटनेस सर्टीफिकेट काढून देणारे डॉक्टर यांना फोन लावणेकरीता विंनती केली असता त्यांनी यातील आरोपी क्र. २ श्री.तुकाराम भिला भोई यांना फोन केला असता नमुद आरोपी क्र. २ यांनी आरोपी क्र. १ श्री तेजी यास तक्रारदार यांचेकडून लाचेची मागणी करण्यास व स्वीकारण्यास प्रोत्साहन दिले म्हणुन नमुद दोन्ही आरोपी यांचेविरूध्द नंदुरबार शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ८४८/२०२३, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अ, १२ व भादवि कलम १७० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. |
| **कामगिरी पथक** | सदर कामगिरी मा.पोलीस अधीक्षक सो, श्रीमती. शर्मिष्ठा घारगे—वालावलकर, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, मा.अप्पर पोलीस अधिक्षक सो., श्री.माधव रेड्डी, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, पोलीस उपअधीक्षक, श्री.नरेंद्र पवार (वाचक) ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, पोलीस उपअधीक्षक, श्री.राकेश आनंदराव चौधरी, ला.प्र.वि., नंदुरबार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. समाधान एम. वाघ, श्रीमती. माधवी एस.वाघ, पोहवा/विलास पाटील, पोहवा/विजय ठाकरे, पोना/अमोल मराठे, पोना/संदीप नावाडेकर, पोना/देवराम गावीत, मपोना/ज्योती पाटील, पोना/मनोज अहिरे व चापोना/जितेन्द्र महाले अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार पथकाने केली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबाबत तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

संपर्क पत्ता: ला.प्र.वि., नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई—मेल: dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४— २३०००९,२३१००९

(माधवी एस.वाघ)
पोलीस निरीक्षक,
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार

Scanned with CamScanner